भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ४२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १८/०१/२०१७

**१) संगनमत करुन जातीवाचक शिविगाळ करुन मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी दिली. :–**

दिनांक १८/०१/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील फिर्यादी धम्मपाल रामदास वैद्य वय २४ वर्ष, रा. कस्तुरबा गांधी वार्ड भंडारा हा अपघाताचे कारणावरुन शिविगाळ करीत असल्याने यातील चारही आरोपीतांनी संगनमत करुन तु आम्हाला का शिवीगाळ करतो यावरुन भांडण करुन फिर्यादीस लाथाबुक्यांनी व विटाने डोक्यावर मारुन जखमी केले व त्याचे आईला सुध्दा मारपीट केल्याने फिर्यादी हे भिन्न जातीचे आहेत हे माहीत असुन सुध्दा फिर्यादी व त्याचे आईला जातीवचक शिविगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भादवी. सहकलम ३(२)(va)अ.प्र.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. फटींग पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) चक्कर आल्याने खाली पडुन औषधोपचारा इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक १७/०१/२०१७ रोजी १५.३० वा. दर. यातील मृतक गफ्फार हुसेन शेख वय ७० वर्ष, रा. लालालजपतराय वार्ड भंडारा हा घोडयाचा टांगा चालवीत असतांना त्याला चक्कर आल्याने खाली पडुन डोक्याला मार लागल्याने त्याला औषधोपचारा करीता सा.रु.भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान ०३.०० वा. मरण पावल्याने डॉ. मेमो व मृतकाचे मुलाचे बयाना वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कन्नाके पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

**३) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १७/०१/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली ८० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तिन सिटर वाहनांवरती १८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ५९ केसेस करण्यात आलेल्या आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.